# वाडा नगरपंचायत वाडा, ता. वाडा, जि. पालघर

**जाहीर आवाहन**

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०२४/प्र.क्र ८७/गृनियो-२ दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ नुसार 'सर्वासाठी घरे' या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०' ची अंबलबजावणी करण्यात येत आहे. तरी वाडा नगरपंचायत हद्दीतील पात्र लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा.

**घरकुल बांधकाम क्षेत्र**

सदर योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) शोचालय व अन्य पायाभूत नागरी सुविधांसह ३० चौ. मी. ते ४५ चौ. मी. पर्यंतची घरे बांधण्यात येतील.

**अनुदान रक्कम**

घरकूल बांधण्यासाठी अनुदान रक्कम हि २.५० लाख एवढी राहील. सदर अनुदान रक्कम हि खालीलप्रमाणे...

| अ.क्र. | घटक | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | BLC | रुपये १.५० लाख प्रति लाभार्थी | रुपये १ लाख प्रति लाभार्थी |

**लाभार्थी पात्रता :-**

1. लाभार्थी कुटुंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित मुले/मुली (Children) (वय वर्ष १८ खालील मुल/मुली) यांचा समावेश असेल.
2. या योजनेंतर्गत अनुदान/सहाय्य प्राप्त करून घेण्याकरिता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.
3. लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
4. योजनेंतर्गत बांधण्यात येणारी घरे ही कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि ज्या कुटुंबात कर्ती महिला सदस्य नसेल त्या कुटुंबात कर्त्या पुरुषांच्या नावे घरे राहतील.
5. पात्र लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा हि रुपये ३.०० लाख पर्यंत असावी.

**पात्र लाभार्थी आवश्यक कागदपत्रे :-**

१) पात्र लाभार्थी आधारकार्ड (आधार नंबर आधार कार्ड नुसार नाव जन्म दिनांक)
२) कुटुंबातील सदस्याचे आधारकार्ड माहिती (आधार नंबर, आधार कार्ड नुसार नाव, जन्म दिनांक)
३) पात्र लाभार्थीचे बँक खाते चे माहिती (खाते नंबर, बँकेचे नाव शाखा IFSC कोड) जे आधारकार्डशी संलग्न असावा.
४) उत्पन्नाचा दाखला
५) जातीचा दाखला (SC, ST, OBC च्या बाबतीत)
६) जमिनीचा पुरावा (सिटी सर्व्हे उतारा किंवा ७/१२ उतारा)

**अर्ज करण्याची पद्धत :-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत लाभार्थी सुनिश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने एक युनिफाइड वेब पोर्टल (https://pmaymis.gov.in/PMAYMIS2_2024/PMAY_SURVEY/EligiblityCheck.aspx) विकसित केले आहे. सदर पोर्टल वरती इच्छुक लाभार्थ्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. या वेबसाईटवर नजीकच्या सी.एस.सी. सेंटर व महा ई-सेवा केंद्रात व इंटरनेट कॅफे केंद्रावर अर्ज करू शकतात.

वरील लिंक करिता QR Code

**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**वाडा नगरपंचायत, वाडा**